# चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपुर

दुरध्वनी क्रमांक -०७१७२ - २५०२२० / २५५६५० ई-मेल आय.डी. - nuhm.chandrapur@gmail.com

क्रमांक :-चंशमनपा/आ.वि./222/२०२६ दिनांक :- 08 /०६/२०२६

**आरोग्य सेवा**

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## मनपा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, चंद्रपुर

### -: सुचना / नोटीस :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत मनपा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, चंद्रपूर मार्फत विविध पदे भरण्याबाबत दिनांक १२/०५/२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार, पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले असता, पात्र व अपात्र उमेदवारांची यादी तसेच, मुलाखतीचा दिनांक चंशमनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होण्याची दिनांक ०५ जुन, २०२६ ही निश्चित करण्यात आली होती.

त्याअनुशंगाने, सर्व संबंधित उमेदवारांना सूचित करण्यात येते की, मा. निवडणूक निर्णय अधिकारी, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदार संघ तथा जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे दिनांक १८ मे, २०२६ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची निवडणूक - २०२६ वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदार संघांतर्गत आदर्श आचार संहितेच्या (Model Code of Conduct) प्रभावी अंमलबजावणी नियमांचे पालन करण्याची दक्षता घेण्याबाबत चंद्रपुर मनपास कळविण्यात आले असल्याने / आदर्श आचारसंहिता लागू झालेली असल्याने, सदर भरती प्रक्रियेसंबंधी पात्र व अपात्र उमेदवारांची यादी, मुलाखतीचे दिनांक, तसेच इतर कोणतीही पुढील कार्यवाहीची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अथवा अन्य माध्यमातून प्रसिध्द करता येणे सध्या शक्य नाही.

आदर्श आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर सदर भरती प्रक्रियेबाबतची पुढील माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

ही सूचना सर्व संबंधितांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

Nuttar

(डॉ. सौ. नयना उत्तरवार)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,
तथा,
सदस्य सचिव पदभरती मनपा निवड समिती,
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान,
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

चंद्रपूर शहर महानगरपालिका आरोग्य विभाग चंद्रपूर